प्रकरण-2

प्रस्तावना

# पाणी पुरवठा प्रकल्प विभाग

उप प्रमुख अभियंता(पापुप्र)म.वै.-1

सन 1970 मध्ये जलस्त्रोतांमध्ये वृध्दी करण्यासाठी या विभागाची स्थापना करण्यात आली. नंतर याला प्रकल्प विभाग असे संबोधण्यात आले तर 1972 पासून या विभागाला पाणी पुरवठा प्रकल्प विभाग (पा.पु.प्र.) असे नाव देण्यात आले.

हा विभाग विविध प्रकल्पाचे नियोजन तसेच त्याची अंमलबजावणी करण्याचे काम करतो. डॉ. चितळे यांच्या समितीच्या शिफारशी नुसार मुंबई महानगरपालिकेच्या पाणी पुरवठयात वृध्दी करण्यासाठी अनेक प्रकल्पांचे नियोजन करण्यात आले. उदा.मुंबई-1, मुंबई-2, 3 व मुंबई 3-अ मुंबई 1,2,3 व मुंबई 3-अ, तसेच पाणी पुरवठा वृध्दीसाठी मुंबई-4, मध्य वैतरणा पाणी पुरवठा प्रकल्पाचे काम पूर्ण झाले आहे.

पाणी पुरवठा प्रकल्प विभागाचा संरचनात्मक तक्ता तसेच जनतेला हवी असलेली विभागाची तपशीलवार माहिती संबंधित अधिका-यांकडून सोबत जोडलेल्या पुस्तिकेमध्ये (मॅन्युअल) उपलब्ध केली गेली आहे.

प्रमुख अभियंता (पाणी पुरवठा प्रकल्प) कार्यालयातर्फे चालू असलेली कामे तसेच विविध प्रकल्पांचे संनियंत्रण केले जाते.

| अ.क्र. | कार्यालयाचे नाव | उपकार्यालयाचे नाव/नावे | उपकार्यालयाचा पत्ता | उप कार्यालयाच्या प्रमुखाचे नाव व हुद्दा | उपकार्यालय प्रमुखाच्या कार्यालयाचा दूरध्वनी क्र. |
|---|---|---|---|---|---|
| 1 | प्रमुख अभियंता (पाणी पुरवठा प्रकल्प) | उप प्रमुख अभियंता (पापुप्र) मध्य वैतरणा-1 | बृहन्मुंबई महानगरपालिका, पाणी पुरवठा प्रकल्प, जकात नाक्याजवळ, ठाणे भिवंडी रोड, बाळकुम,ठाणे (प) 400 608. | श्री. पांडुरंग बिरा बंडगर , उप प्रमुख अभियंता (पापुप्र) मध्य वैतरणा-१ | 25430533 |

सही-

**उप प्रमुख अभियंता(पा.पु.प्र.)म.वै.-1**

## प्रकरण-2 (पुस्तिका-1)
## **संस्थेची संरचना , कामे व कर्तव्याबाबतचा तपशील**

2.1 <u>लोकप्राधिकरणाची उद्दिष्टे व हेतू</u> :-

नवीन जलस्त्रोताबाबतची कामे, नवीन जलवाहिन्या टाकणे, त्याकरिता बोगदे, भूयारे इ.ची बांधणी. सेवाजलाशयासह अधिकाधीक पाणी आणून त्याच्या समान वितरणाकरिता टाकण्यात येणा-या जलवाहिन्या, नवीन उदंचन केंद्रे, जलप्रक्रिया केंद्रे, जलशुद्धिकरण प्रक्रिया केंद्रे, महासंतुलित जलाशय इ. च्या बांधणी, पुनर्बांधणीच्या तसेच त्यासंबंधीत सर्व कामांसाठी आवश्यक असणारे स्थापत्य, यांत्रिकी व विद्युत घटकांबाबतचे नियोजन, बांधणी व उभारणी करणे.

2.2 <u>विशेष कार्य / कल्पना (नियोजन)</u> :-

मुंबई शहराच्या विविध परिक्षेत्रातील लोकसंख्येला सर्वोच्च प्रतीच्या आंतरराष्ट्रीय मानक दर्जाच्या पिण्याच्या पाण्याचे 24 तास समान प्रमाणात वाटप होण्याचे उद्दीष्ट गाठणे.

2.3 <u>इतिहास व माहितीचा संदर्भ</u> :-

मुंबई शहर व उपनगरांचा विस्तार होऊ लागल्यामुळे पाण्याची मागणी वाढली, यास्तव पाण्याचा अतिरिक्त पुरवठा करण्याकरिता हाती घ्यावयाच्या नवीन पाणी पुरवठा प्रकल्पांसाठी प्रमुख अभियंता (पूर्वीचे नांव प्रकल्प अभियंता) असा वेगळा विभागच स्थापन करण्याची गरज भासली. या प्रकल्पाच्या कामांमध्ये जलस्त्रोताच्या विकासापासून ते उच्चतम दर्जाचे पाणी शहर, पूर्व आणि पश्चिम उपनगरांमधील जलाशयापर्यंत आणण्याकरिता केंद्र सरकार व राज्य सरकारकडून लागणा-या विविध मान्यता / मंजूरी घेणे, भूसंपादनापासून ते संपूर्ण व्यवस्थेची संकल्प चित्रे तयार करणे इ. गोष्टींचा अंतर्भाव होतो. सध्याच्या पाणी पुरवठा प्रकल्पांमध्ये ब-याचशा यांत्रिकी व विद्युत घटकांचा उदा. विद्युत उपकेंद्रे, उदंचन संयंत्रे, हरिनिकरण संयंत्रे, प्रक्रीया संयंत्रे विभागातील प्रकाशाची सोय, जलवाहिन्यांमधील झडपा, जोडणीची इतर कामे तसेच संलग्न सेवा जसे उद्वाहन, वातानुकुलन, संपर्क सुविधा इ.चा समावेश आहे.

उपप्रमुख अभियंता (पापुप्र) मवै-1 यांचा विभाग खात्यातील कर्मचारी अधिकारी किंवा प्रकल्प सल्लागार यांच्या सहकार्याने वरील कामांचे नियोजन करून ती कामे

प्रत्यक्ष पार पाडतात.

2.4 कर्तव्ये :-

नियोजन, संकल्पचित्रे, अंदाज, निविदा तयार करणे, मागविणे व छाननी करणे, प्रत्यक्ष कार्यादेश देणे, प्रकल्पाच्या कामावर देखरेख करणे, आंतर विभाग तसेच बाहयविभाग जसे राज्य व केंद्र शासन यांच्याशी भूमीसंपादन व प्रकल्पग्रस्तांचे पुनर्वसन करण्यासंदर्भात संपर्क साधून नियोजीत काल मर्यादेत कामे पूर्ण करुन घेणे ही या विभागातील कर्मचा-यांची प्रमुख कर्तव्ये आहेत. तसेच कर्मचा-यांना कामाच्या प्रगतीची नोंद ठेवून मासिक अहवाल सादर करावे लागतात.

2.5 मुख्य कामे / कार्य :-

प्रमाणभूत दर्जाचा पाणीपुरवठा संबंधित विविध प्रकल्प टप्प्या टप्प्याने राबविणे.

2.6 पुरविण्यात येणा-या सेवांची यादी :-

चालू कामे - 1) प्रकल्पबाधित लोकांचे पुनर्वसन करण्याचा खर्च .

२) अमर महाल ते वडाळा आणि पुढे परेल पर्यंत बोगदा बांधणे.

2.7 संरचनात्मक तक्ता :-**उप-प्रमुख अभियंता (पापुप्र) मवै-1**

| | |
|---|---|
| उप-प्रमुख अभियंता (पापुप्र) मवै-1- | 1 |
| कार्यकारी अभियंता (पा.पु.प्र.) म.वै.-1 | 1 |
| सहाय्यक अभियंता- | 1 |
| दुय्यम अभियंता- | रिक्त |
| कनिष्ठ अभियंता- | रिक्त |
| मुख्य लिपिक - | 1 |
| लिपिक- | 2 |
| वरिष्ठ लघुलेखक-<br>टंकलेखक (टंकलेखकाचे पद हे लिपिक पदात रुपांतरीत करण्यात आले आहे)- | रिक्त<br>रिक्त |
| शिपाई-<br>मुकादम-<br>कामगार- | 1<br>रिक्त<br>रिक्त |
| अभिलेख परिचर (कार्यव्यवस्थेवर) | 1 |

2.8 जनतेकडून अपेक्षा :-

कामे प्रगतीपथावर असताना होणारी गैरसोय जनतेने कृपया समजून घ्यावी. पाण्याचा अपव्यय टाळावा जेणेकरुन या बहुमूल्य नैसर्गिक स्त्रोताची मागणी आटोक्यात राहील आणि ते आपल्याला जास्त काळ लाभू शकेल.

2.9 जनतेच्या सहभागाच्या योजना :-

बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या अधिनियमातील तरतुदीनुसार स्वच्छ पाणी पुरवठयाची आपली मुलभूत कर्तव्ये पार पाडण्यासाठी ही स्वायत्त संस्था सदर प्रकल्पाचे काम स्वखर्चाने पार पाडत आहे.

2.10 सेवा पुरविण्याची संरचना व जनतेच्या तक्रार निवारणासाठी यंत्रणा :-

सर्वसाधारणपणे प्रकल्पाच्या कामांसाठी अशा यंत्रणेची व्यवस्था नसते / लागू होत नाही. तरीसुध्दा या कामांसाठी नेमण्यात आलेले अधिकारी जनतेच्या तक्रारी असल्यास त्याचे निवारण करीत असतात. पाणी पुरवठा करणा-या जलवाहिन्यांचे जाळे कार्यान्वित असून प्रत्येक प्रभागामध्ये पाणी पट्टी जमा करण्यासाठी, जनतेच्या तक्रारी ऐकून त्यांचे निवारण करण्याचे काम जल अभियंता या खात्याचे अधिकारी करीत आहेत.

सही-

**उप प्रमुख अभियंता(पा.पु.प्र.)म.वै.-1**